सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीची मानीव अभिहस्तांतरण फी (Deemed Conveyance Fee) शासनाच्या खात्यात जमा करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष देणेबाबत. (०४२५०२७९)

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सगृयो-२०१४/१२९/प्र.क्र.४७/१४-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख:- २२ डिसेंबर, २०१६

**वाचा**

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक सगृयो-२०१४/१२९/प्र.क्र.४७/१४-स, दि.७ ऑगस्ट, २०१४
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक सगृयो-२०१४/१२९/प्र.क्र.४७/१४-स, दि.१९ सप्टेंबर, २०१४.
३) महालेखापाल, महाराष्ट्र , मुंबई यांचे पत्र क्र.सं ख.वि/चा.१ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/यूओआर-२७/२०१५-१६/३३२, दि.१०.०६.२०१५.

**प्रस्तावना**

वरील संदर्भीय दि.७ ऑगस्ट, २०१४ व दि.१९ सप्टेंबर, २०१४ रोजीचे दोन्ही शासन निर्णय याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकाबाबत दि.२३.०३.२००८ रोजी अधिनियम १९६३ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली असून मानीव अभिहस्तांतरण तरतूद व कार्यपध्दती मोफा अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेली आहे. या संदर्भात दि.२७.०९.२०१० अन्वये नियमांमध्ये देखील दुरुस्ती केलेली आहे. त्यानुषंगाने सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमीन मानीव अभिहस्तांतरणाचे काम जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेस्तरावर सुरु आहे. त्यासंबंधात जमीन मानीव अभिहस्तांतरणाकरिता विहित करण्यात आलेले शुल्क न्यायालयीन मुद्रांक शुल्काव्दारे वसूल करण्यात येत होते.

३. जमीन मानीव अभिहस्तांतरणाचे काम हे दि.१ मे, २०१४ पासून ऑनलाईन पध्दतीने करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. तथापि, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीचे मानीव अभिहस्तांतरण शुल्क शासन खात्यात जमा करण्यासाठी सध्या स्वतंत्र लेखाशीर्ष नव्हते.

४. आता महालेखापाल, महाराष्ट्र , मुंबई यांचे संदर्भातील क्र.३ येथील दि.१०.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून प्राप्त होणारे शुल्क जमा करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीची मानीव अभिहस्तांतरण शुल्क (Deemed Conveyance Fee) शासनाच्या खात्यात जमा करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष (०४२५०२७९) देण्याची बाब शासनांच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीचे मानीव अभिहस्तांतरण शुल्क शासन खात्यात जमा करण्यासाठी खालील नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| लेखाशीर्ष | Budget Head |
|---|---|
| ०४२५ सहकार,<br>८०० इतर जमा,<br>(०१) इतर जमा रकमा,<br>(०१)(२३) मानीव अभिहस्तांतरण फी<br>(०४२५०२७९) | ०४२५-CO-OPRATION<br>८००-Other Receipts<br>०१- Other Receipts Act Fees<br>(०१)(२३) Deemed Conveyance Fees<br>(०४२५०२७९) |

२. सदर शासन निर्णय महालेखापाल, (लेखा अज्ञुनेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.३ येथील पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.४५०/अर्थ-१३, दि.१५.०७.२०१४ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१२२२१६३३४८९२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh P. Khorgade

Digitally signed by Santosh P. Khorgade
DN: CN = Santosh P. Khorgade, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-operation Marketing And Textiles Department
Date: 2016.12.22 16:37:51 +05'30'

**( सं.पु.खोरगडे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१.अप्पर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखापरीक्षा)- १ महाराष्ट्र, मुंबई.
३.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखापरीक्षा)- २ महाराष्ट्र, नागपूर.
४.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५.उप सचिव (अर्थ), सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७.निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
८.सर्व जिल्हा लेखा कोषागार अधिकारी.
९.कक्ष अधिकारी, वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव (१७-स), सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११.कक्ष अधिकारी (रोख शाखा), सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२.सर्व विभागीय सहनिबंधक/सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक /उपनिबंधक/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
१३.निवडनस्ती/१४-स.